मा. विशेष न्यायालय ल्पे सांगली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विटा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0269 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/05/2023 00:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 16/05/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/05/2023
**Time From (वेळेपासून):** 17:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/05/2023 **Time (वेळ):** 00:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/05/2023 00:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगरपरीषद , विटा ,खानापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. पंकज ज्योतिराम दबडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शाहुनगर, विटा ,खानापुर,विटा,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शाहुनगर, विटा ,खानापुर,विटा,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आलोसे विनायक विजय औंधकर | | | 1. नगरपरिषद ,विटा ,ता खानापुर, विटा,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 17.05.2023

मी पंकज ज्योतीराम दबडे, वय 39 वर्ष, व्यवसाय:- बांधकाम कॉन्ट्रॅक्टर रा. शाहुनगर विटा, ता.खानापूर, जि. सांगली. मो.नं. 8625099294
मी वरील ठिकाणी मी माझे वडील ज्योतीराम दबडे, आई श्रीमती छाया दबडे, पत्नी सौ.अर्चना दबडे व 2 मुले असे एकत्रित राहणेस आहे. मी सुमारे 5 ते 6 वर्षापासून बांधकाम कॉन्ट्रॅक्टर म्हणून विटा शहरात काम करीत आहे. माझे परिचयाचे बाळासाहेब सिदू माने रा.देवीखिंडी ता.खानापूर जि.सांगली यांचे विटा कराड जाणारे रोडलगत गट नं. 287/10 चा प्लॉट नं.2 मध्ये 5 मजली अपार्टमेंट बांधकाम करण्याचे कॉन्ट्रॅक्ट मी घेतलेले आहे. त्याबाबत रितसर बांधकामाचे करारपत्र मी दि.14.11.2022 रोजी केलेले असून मी विटा नगरपरिषद येथे वरील कामाची बांधकाम परवानगी मिळणेसाठी दि.27.02.2023 रोजी बांधकाम परवान्याची फाईल जमा केलेली होती.

मी दि.27.03.2023 रोजी विटा नगरपरिषद येथे जावून माझा बांधकाम परवाना मंजुर झाला आहे किंवा नाही याबाबत नगररचना विभागात चौकशी केली असता तो अद्याप मंजूर झाला नसल्याचे मला समजले त्यामुळे मी श्री. औंधकर, मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद यांची भेट घेतली असता त्यांनी माझी बांधकाम परवान्याची फाईल मागवून घेतली. त्यानंतर त्यांनी अपार्टमेंट मध्ये 25 युनिट असल्याचे व प्रत्येक युनिट मागे 10,000/- रूपये प्रमाणे 2,50,000/- रूपये बांधकाम परवानगीची फाईल मंजूर करण्यासाठी द्यावे लागतील असे मला सांगितले. मी त्यांना रक्कम कमी करणेची विनंती केली असता त्यांनी बांधकाम परवान्याची फाईल मंजूर करणेसाठी 2,50,000/- रूपये द्यावेच लागतील असे मला सांगितले.

मी बांधकाम परवान्याची फाईल नगरपरिषद कार्यालयात जमा करून सुमारे 2 महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला तरी बांधकाम परवाना न मिळाल्याने व श्री. औंधकर, मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.16.05.2023 रोजी सकाळी 11.00 वा चे सुमारास अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली येथे जावून पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील साहेब यांचे भेट घेवून त्यांना माझी श्री.औंधकर मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांचेविरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता पाटील साहेब यांनी मला लेखी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी अर्ज दिला. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील साहेब यांनी दोन सरकारी पंच अॅन्टी करप्शन कार्यालयात बोलावुन घेऊन मला सापळा पथकाची व दोन सरकारी पंचांची ओळख करुन दिली. पाटील साहेब यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली. त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली. माझे तक्रारी अर्जावर पोलीस उप अधीक्षक श्री. पाटील साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या. त्यानंतर श्री. औंधकर मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांचे विरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पाटील साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर श्री. पाटील साहेब यांनी मला विटा गावाच्या अलीकडे 4 कि.मी. जावून थांबण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील वाहनाने एसीबी कार्यालयातून रवाना होवून विटा गावाच्या 4 कि.मी. अलीकडे रस्त्याकडेला थांबलो व मी थांबले ठिकाणाबाबत श्री.पाटील साहेब यांना माहिती दिली. त्यानंतर काही वेळानंतर श्री.पाटील साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने मी थांबलो त्याठिकाणी आले. पाटील साहेब यांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये येवून बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील वाहन पार्क करून पाटील साहेब यांचे वाहनामध्ये येवून बसलो. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. व सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री. मुदलीयार यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. वडगावे यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच मुदलीयार असे माझेकडील कारने रवाना होवून नगरपरिषद विटा कार्यालय येथे श्री.औंधकर, मुख्याधिकारी यांची भेट घेवून परत श्री.पाटील साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. सदर पडताळणी कारवाईमध्ये मध्ये पाटील साहेबांनी मला व पंच



Scanned with OKEN Scanner

मुदलीयार यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली. त्यामध्ये मी श्री. औंधकर यांना माझे सोबत असले पंच नं.1 हे बाळु सिध्दु माने आमचे मालक आहेत अशी ओळख करून दिली. त्यानंतर श्री. औंधकर मुख्याधिकारी यांनी माझेशी बांधकाम परवान्याचे फाईल बाबत चर्चा केली त्यावेळी मी त्यांना "पुढचा विषय कसा करायचा" असे विचारले असता श्री. औंधकर यांनी "मी फाईल बघतो ना, फाईल बघून सांगतो" असे म्हणाले. त्यानंतर मी, श्री.औंधकर यांना "मी सांगितल तुमची डिमांड" असे म्हणालो असता श्री.औंधकर यांनी पंच नं.1 यांना उद्देशून "सांगितल की हयांना मी त्यावेळेस" असे म्हणाले. त्यानंतर मी पंच नं 1 यांना "साहेबांनी त्यावेळी अडीच सांगितलेली, मी साहेबांना एक सांगितलेल त्यावेळी" असे म्हणून श्री. औंधकर यांना "साहेब कायतर मार्ग काढून साहेब संपवा" असे म्हणालो. त्यावर श्री. औंधकर यांनी मला "अहो तुम्हाला किती सांगितलं होत ते" असे विचारले. त्यावर मी श्री. औंधकर यांना "अडीच सांगितल होत त्यावेळी, अडीच लाख" असे म्हणालो. त्यावर श्री. औंधकर यांनी "हे विषय हयाच्यात बरोबरच आहे, मी जास्त कमी सांगितलेलच नाही" असे म्हणाले. त्यावर मी, श्री. औंधकर यांना लाच रक्कम कमी करण्याबाबत पुन्हा विनंती केली त्यावेळी श्री.औंधकर यांनी "दोन पंचवीस द्या" असे म्हणालेने मी त्यांना "दोन पंचवीस राहुद्या, दोनला संपवा" असे म्हणालो. त्यावर श्री. औंधकर यांनी "ठिक आहे मग या करून, मी तुम्हाला लगेच ऑनलाईन विषय करून देतो" असे म्हणून लागलीच लाच रक्कम घेवून येण्यास सांगितले.

एकंदरीत झाले पडताळणी कारवाईमध्ये श्री. औंधकर, मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांनी पैसे लागलीच घेवून येण्यास सांगितले असल्याने श्री.पाटील साहेब यांनी लागलीच श्री. औंधकर, मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांच्यावर सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर श्री. पाटील साहेब यांनी मला लाच रक्कम हजर करणेबाबत सांगितले असता मी माझेकडील शिल्लकीतील 2,00,000/- रुपये हजर केले. त्यावेळी श्री. पाटील साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच व श्री.पाटील साहेब यांनी सहया केल्या. श्री. पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना व कापडी पिशवीला पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा त्या कापडी पिशवीमध्ये घालून माझे पॅन्टच्या पाठीमागील खिश्यामध्ये ठेवली व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच मुदलीयार असे रवाना होवून विटा नगरपरिषद कार्यालय येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ पाटील साहेब, पंच वडगावे व सापळा पथक असे खाजगी वाहनाने विटा नगरपरिषद कार्यालयात सापळा लावुन थांबले.

मी मुख्याधिकारी श्री.औंधकर यांना माझे मोबाईल वरून फोन करून मी कार्यालया बाहेर आल्याचे सांगितले असता मुख्याधिकारी श्री. औंधकर यांनी मला त्यांचे कक्षामध्ये येणेस सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 श्री:मुदलीयार असे श्री. औंधकर यांचे कक्षासमोर जावून मी श्री.औंधकर यांना "येवू का" असे विचारले असता श्री.औंधकर यांनी मला आत बोलावून घेवून "किती आणलेत" असे म्हणून माझेकडे लाच मागणी केली असता मी "दोन आणलेत, फक्त फाईल तेवढी" असे म्हणून मी औंधकर, मुख्याधिकारी यांचेसमोर मी माझे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशातील 2,00,000/- रुपये अॅथ्रॅसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कमेची कापडी पिशवी माझे डावे हाताने बाहेर काढुन श्री. औंधकर, मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांचे समोर धरली असता श्री.औंधकर, मुख्याधिकारी यांनी लाच रक्कम त्यांचे डावे हाताने स्विकारुन त्यांचे टेबलचे डाव्या बाजूचे ड्रायव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर श्री. औंधकर यांनी मला "समोरच करणार क्लिअर लगेच" असे म्हणाले त्यावर मी श्री.औंधकर यांना "आमचेवर विनाकारण व्याप नको" असे म्हणालो. त्यावर श्री.औंधकर यांनी "नंबर हाय काय तुमच्या फाईलचा, कोणाकडे हाय"असे विचारले त्यावर मी श्री.औंधकर यांना "गायकवाड साहेबांच्याकडे" असे सांगितले. त्यावर श्री. औंधकर यांनी मला "जावून नंबर घेवून या" असे सांगितले. त्यावेळी मी मुख्याधिकारी यांचे केबीनचे बाहेर येवून माझेकडील हातरुमाल उजवे हाताने बाहेर काढून हातरुमालाने तोंड पुसून लाच स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व पाटील साहेब यांनी मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने मुख्याधिकारी यांचे कक्षामध्ये प्रवेश करून श्री. औंधकर, मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांना पकडले.

सदर ठिकाणी पाटील साहेबांनी श्री. औंधकर, मुख्याधिकारी विटा नगरपरिषद यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. विनायक विजय औंधकर, वय-47 वर्षे, व्यवसाय- मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद राहणार मुख्याधिकारी निवास मायणी रोड विटा, मुळ राहणार कासेगाव चावडी चौक, ता.वाळवा, जि.सांगली असे असल्याचे सांगीतले.

सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी सापळापूर्व सापळा



Scanned with OKEN Scanner

पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह विटा येथे पूर्ण करण्यात आली.
तरी दि. 16.05.2023 रोजी दुपारी 15.00 वा. ते दुपारी 17.30 वा. च्या दरम्यान लोकसेवक श्री.विनायक विजय औंधकर, वय-47 वर्षे, व्यवसाय- मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद राहणार मुख्याधिकारी निवास मायणी रोड विटा, यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून माझे विटा ते कराड जाणारे रोडलगत असले गट नं.287/10 चा प्लॉट नं.2 मधील 5 मजली अपार्टमेंटचे बांधकाम परवान्याची फाईल मंजुर करण्यासाठी स्वत: करीता माझेकडे 2,50,000/- रूपयांची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 2,00,000/- रूपयांची मागणी करून विटा नगरपरिषद विटा येथे मुख्याधिकारी कक्षामध्ये माझ्याकडून 2,00,000/- रुपये लाच रक्कम स्वीकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री.विनायक विजय औंधकर, वय-47 वर्षे, व्यवसाय- मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद राहणार मुख्याधिकारी निवास मायणी रोड विटा यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Shriprasad Mahadevrao Yadav(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Boccucad

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Madane
HC 1685

**Signature of Officer in Charge, Police Station** पो.ठाणे अंमलदार पिंपरी पोलीस ठाणे
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Shriprasad Mahadev
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**



Scanned with OKEN Scanner